# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

### नोंदणीकृत पदवीधर मतदार यादीच्या मुद्रित प्रतीबाबत

### जाहीर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(न)|(28(2)(t)| व कलम १३१ मधील तरतूदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (Register Graduates) अधिसभेवर (Senate) निवडून देण्याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधरांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी, मतदार यादी तयार करण्यासाठी विद्यापीठाच्या निवडणूक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रकटने प्रसिद्ध करुन दिनांक १० जून, २०१७ ते दिनांक २९/०७/२०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन नोंदणीकृत पदवीधर मतदारांची अंतिम मतदार यादी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ८ (७) मध्ये 'मतदार यादीच्या मुद्रित प्रती हया, अर्ज केल्यावर व विद्यापीठाकडून विहित करण्यात येईल अशी फी प्रदान केल्यावर कोणत्याही व्यक्तीला देण्यात येतील', अशी तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन नोंदणीकृत पदवीधर मतदार यादीच्या मुद्रित प्रतीची फी रु. ५,०००/- (रुपये पाच हजार) एवढी ठरविण्यात आली आहे. एकरुप परिनियमातील तरतूदीप्रमाणे सदर मतदार यादीच्या मुद्रित प्रतीची मागणी अर्जदाराने केल्यास सदरची फी विद्यापीठाच्या बँक खात्यामध्ये चलनाद्वारे जमा केल्यानंतर सदरच्या मतदार यादीची मुद्रित प्रत अर्जदारास निवडणूक विभागामार्फत पुरविण्यात येईल.

10/10/17

(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ १४८
दिनांक : १०/१०/२०१७

D:\Election 2017\Nondanikrut Padvidhar(Registered Graduates)\Prakatan\Prakatan.docx